## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यार्थ्यांनो ! जीवनात जिद्द सोडू नका, आत्मविश्वास वाढवा - प्रा. दिनेश सुर्यवंशी
## विद्यापीठात फिजीक्स सोसायटीचे उद्‌घाटन संपन्न

अमरावती-

विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळत असून त्या संधीचे सोने त्यांना करावयाचे आहे. देश विकासात विद्यार्थ्यांचा फार मोठा हातभार असून स्व-विकासापासून ते देश विकासासाठी विद्यार्थ्यांनी जिद्दी राहून व आत्मविश्वास वाढवून कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवरील राज्यपाल नामित सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी यांनी केले. विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने फिजीक्स सोसायटीचा उद्‌घाटन कार्यक्रम दृकश्राव्य सभागृहात संपन्न झाला, याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागप्रमुख तथा व्य.प. सदस्य डॉ.एस.के. ओमनवार, आय.आय.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, फिजीक्स सोसायटीच्या अध्यक्ष कु. आचल शर्मा, उपाध्यक्ष शिवाजी सावंत, डॉ. कमलेश अलटी उपस्थित होते.

प्रा. दिनेश सुर्यवंशी पुढे म्हणाले, युथ हा माझा जिव्हाळ्याचा विषय आहे. देशात बुद्धी व प्रतिभेची कमतरता नाही, परंतु बुद्धी व प्रतिभेचा विवेकपूर्ण वापर महत्वाचा असून विद्यार्थ्यांनी त्यादृष्टीने सातत्याने कार्य केले पाहिजे. भूतकाळाचा विचार न करता वर्तमानाचा विचार करुन भविष्याचा वेध विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. समस्या ही संशोधनाची जननी असून ती प्रेरणेचे साधन आहे. त्यादृष्टीने नाविन्यपूर्ण संशोधनावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा व सर्वसमावेशक शिक्षण घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

आय.एल.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले यांनी फिजीक्स सोसायटीचे उद्‌घाटन झाल्याची घोषणा केली. मार्गदर्शन करतांना म्हणाले, संशोधन हा महत्वाचा भाग आहे. दिवसेंदिवस शासकीय नोकऱ्या कमी होत आहे. विद्यार्थ्यांनी रोजगार देणारे उद्योजक होण्यासाठी जास्तीतजास्त स्टार्टअप करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या प्रयत्नाला इन्क्युबेशन केंद्राच्या माध्यमातून परिपूर्णता प्राप्त होवू शकेल आणि ते उदयोन्मुख उद्योजक म्हणून पुढे येतील, असे सांगून इन्क्युबेशन सेंटर विद्यापीठ परिसरात लवकरच सुरु होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ.एस.के. ओमनवार यांनी फिजीक्स सोसायटीच्या विविध कार्यक्रमांवर प्रकाश टाकला. स्कोपस पब्लीकेशनमध्ये भौतिकशास्त्र विभागाचे जास्तीतजास्त संशोधन प्रकाशित झाल्याची माहिती त्यांनी दिली. नवीन अभ्यासक्रम लवकरच लागू होणार असल्याचे सांगून विभागातील विविध विकासात्मक कार्याची माहिती दिली.

माता सरस्वती व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी शॉल, श्रीफळ व पुस्तक देवून प्रा. दिनेश सुर्यवंशी व डॉ.डी.टी. इंगोले यांचा डॉ.एस.के. ओमनवार यांनी विभागाच्यावतीने सत्कार केला. स्वागत गीताने व पुष्प देवून पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भौतिकशास्त्र विभागातून गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच नेट, सेट, गेट, जेस्ट व आचार्य पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संचालन सुरेश तायडे व कु. श्वेता वाघमारे यांनी, तर आभार अविनाश परीस्कर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्याभारती महाविद्यालयातील प्रा. वासनिक, प्रा. वडतकर, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. गजानन मुळे, डॉ. संदीप वाघुळे यांचेसह भौतिकशास्त्र विभाग, विद्याभारती, व्ही.एम.व्ही., व शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/०८/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी